**सी.एन.आर.क.एम.एच.बी.आय१०.०००२०-२०१८**

## किरकोळ अर्ज क.१/२०१८ मध्ये निशानी क.०१ वर आदेश

उज्वला व ईतर वि. निरंक

१. अर्जदार उज्वला व इतर आठ यांनी सदरचा अर्ज वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी दाखल केलेला आहे. अर्जदार क्रमांक १ ते ५ चे पिता, अर्जदार क्रमांक ६/१ चे सासरे आणि अर्जदार क्रमांक ६/२ ते ६/४ यांची आज्जी नामे गंधारीबाई नरहरी हजारे ह्या भिमनगर, ता. केज, जि. बीड येथील रहिवाशी होत्या, त्या दिनांक २३/०८/१९९८ रोजी भिमनगर, ता. केज, जि. बीड येथे मयत झाल्या आहेत. त्यामुळे मयत गंधारीबाई नरहरी हजारे यांच्या पश्चात अर्जदार क्र.१ ते ५, ६/१ ते ६/४ शिवाय सदर मयतास इतर कोणीही वारस नाहीत. मयत गंधारीबाई नरहरी हजारे यांचा मुलगा बलभिम हा दिनांक १२/११/१९९९ रोजी मयत पावला असुन अर्जदार क्र.६/१ ही मयत बलभिमची पत्नी तर क्र.६/२ ते ६/४ हे मयत बलभिम मुले व मुली आहेत.

२. अर्जदारांच्या अर्जातील कथनानुसार त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी प्रस्तुत प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. या अर्जासोबत अर्जदारांनी निशाणी ६ येथे नगरपंचायत कार्यालय, केज यांनी दिलेले वारसाचे प्रमाणपत्र, निशाणी ७ येथे नगरपंचायत कार्यालय, केज यांनी मयताच्या मृत्युप्रमाणपत्राची सत्यप्रत आणि शपथपत्र दिलेले आहे.

३. अर्जातील कथनास व विनंतीस कोणाचा अक्षेप आहे की, नाही हे पडताळून पाहणे कामी अर्जातील मजकूराची जाहीर प्रसिध्दी स्थानिक वृत्तपत्र ''पार्श्वभुमी'' च्या दिनांक ०५/०१/२०१८ च्या आवृत्तीत प्रसिध्द केली गेली. सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ते हा आदेश होईपर्यंत कोणत्याही व्यक्तीचा विरोध वा

आक्षेप या न्यायालयास प्राप्त झाला नाही, अर्जदार क्र.४ सुशीलाची साक्ष नि.१० वर शपथपत्राद्वारे नोंदवण्यात आली आहे. तिची साक्ष ही उलट तपासाविना आहे आणि उजर नसल्यामुळे अबाधित आहे. शपथपत्रातील केलेले अभिकथन हे अर्जातील नमूद कथनास तंतोतंत मिळते जुळते आहेत. अर्जदार क्रमांक ४ चा पुरावा असे दर्शवितो की, मयत गंधारीबाई हजारे हया केज, ता.केज, जिल्हा बीड येथील रहिवाशी होत्या त्या दिनांक २३/०८/१९९८ रोजी केज, ता. केज, जि. बीड येथे मयत झाल्या आहेत. अर्जदार क्र.४ स्वतः, अर्जदार क्र.१ ते ३ व ५ हया मयताच्या मुली तर अर्जदार क्रमांक ६/१ ही मयताची सुन आणि अर्जदार क्र.६/२ ते ६/४ हे मयताचे नातु आहेत. अर्जातील कथन व शपथपत्रातील पुरावा की, गंधारीबाई हजारे हया दिनांक २३/०८/१९९८ रोजी केज येथे मयत झाल्या, यास नगरपंचायत कार्यालय, केज यांनी निर्गमित केलेले नि.क्र.७ वरील मुत्यू प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीने पुष्टी देते.

४. आता हे पाहणे गरजेचे आहे की, मयत गंधारीबाई हजारे याचे वर्ग-१ मधील वारस कोण होवु शकतात. हिंदु वारसा कायद्यातील कलम १५ मध्ये एखाद्या मयत महिलेचे वारस कोण असु शकतात हे नमुद केलेले आहे. त्यातील उपकलम १ पोटकलम अ असे सांगतो की, मयत महिलेचे मुले, मुली व पती तिचे वर्ग-१ चे कायदेशिर वारस ठरतात. त्यामध्ये मयत मुलाच्या व मुलींच्या मुलांचाही समावेश होतो. अर्जदार क्रमांक १ ते ५ हया मयताच्या मुली असल्याने तसेच अर्जदार क्रमांक ६/२ ते ६/४ हे मयताच्या मयत मुलांचे अपत्ये असल्याने ते मयताचे कायदेशिर वर्ग-१ चे वारस ठरतात. अर्जदार क्रमांक ६/१ ही मयताची सुन असल्याने ती तिची वर्ग-१ ची कायदेशिर वारस ठरत नाही. सबब असा निष्कर्ष काढण्यात येतो की, अर्जदार क्र.१ ते ५, ६/२ ते ६/४ हेच मयताचे ''वारसाचे प्रमाणपत्र'' मिळविण्यास पात्र आहेत, करिता खालील प्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

# आदेश

१. अर्जदारांचा अर्ज अशंतः मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ ते ५, ६/२ ते ६/४ हे मयत गंधारीबाई नरहरी हजारे, रा. केज, ता. केज, जिल्हा बीड यांचे कायदेशीर वारस असलेबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात यावे. सदर वारस प्रमाणपत्र मयताचे नावावर असलेल्या कोणतीही रक्कम उचलणेकामी वापरणेत येवु नये.

३. सबब संचिका निकाली काढण्यात आली.

स्वाक्षरीत/-

दिनांक २२/०२/२०१८

( राहुल द. डांगे )

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, केज